महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०२५

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

राज्यातील अन्न व औषध विभागाच्या प्रयोगशाळांतील रिक्त पदे भरण्याबाबत

(१) ८९ (३०-०४-२०२५). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.सुरेश धस (आष्टी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.अशोकराव माने (बापू) दलीतमित्र (हातकणंगले), डॉ.तानाजी सावंत (परांडा), श्री.धनंजय मुंडे (परळी) : सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अन्न व औषध प्रशासन विभागातील मंजूर पदांपैकी ५० टक्के पदे रिक्त असल्याचे माहे डिसेंबर,२०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धाराशिव जिल्ह्यात ५५० पेक्षा जास्त औषधांची (मेडिकल) दुकाने असून बहुतांशी औषध दुकानदार हे औषधपत्रा (प्रिस्क्रिप्शन) शिवाय औषधांची विक्री करुन नागरीकांचे आरोग्य धोक्यात असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अन्न व औषध प्रशासन विभागात औषध निरीक्षकाचे पद रिक्त असल्यामुळे मेडिकल दुकानांची नियमित तपासणी होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील ८९४७ पैकी ८८४ खासगी नर्सिंग होम्सनी परवान्याचे नूतनीकरण झाले नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यात रिक्त असलेल्या पदांमुळे औषधांचा तपासणी अहवाल तसेच औषध निर्मिती करणाऱ्या कंपन्यांचे परवाने तपासणीच्या कामावर त्याचा परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. नरहरी झिरवाळ (०६-११-२०२५) : (१) हे अंशत: खरे आहे.

अन्न व औषध प्रशासनात औषध निरीक्षकांची २०० पदे मंजूर असून त्यापैकी ४५ औषध निरीक्षक सध्या कार्यरत आहेत.

(२) व (३) धाराशिव जिल्ह्यात घाऊक व किरकोळ औषध विक्री आस्थापनांची संख्या १५९१ आहेत. सन २०२४-२५ या कालावधीत एकूण १३१ आस्थापनांच्या तपासण्या करण्यात आल्या आहेत. त्यापैकी कारणे दाखवा नोटिसच्या अनुषंगाने ०२ आस्थापनांचे परवाने रद्द व २९ आस्थापनांचे परवाने निलंबित केले आहेत.

(४) हे अंशत: खरे आहे.

सद्य:स्थितीत राज्यात (बृहन्मुंबई महानगर पालिका क्षेत्र वगळून) एकूण २११४६ खाजगी नर्सिंग होम्सनां नोंदणी देण्यात आली आहे. त्यापैकी १४९९६ खाजगी नर्सिंग होम्सना नुतणीकरण देण्यात आले आहे. ५८० खाजगी नर्सिंग होम्स कायमस्वरुपी बंद झाले असून, ६४३ खाजगी नर्सिंग होम्सला नुतणीकरण देण्याबाबतची कार्यवाही स्थानिक पर्यवेक्षीय प्राधिकारी यांचे मार्फत सुरु आहे. तसेच, ४९२७ खाजगी नर्सिंग होम्सच्या नोंदणीनंतर, नुतणीकरणासाठी आवश्यक असलेला तीन वर्षाचा कालावधी पूर्ण झाला नसल्याने, त्यांना नुतणीकरण देण्याचा प्रश्नाच उद्भवत नाही.

वि.स. २१ (2)
(५) हे अंशत: खरे आहे.

औषधे व सौदर्य प्रसाधने कायदा, १९४० नुसार औषध उत्पादकांच्या नियमित तपासण्या करण्यात येतात. मात्र, विक्रेत्यांच्या नियमानुसार अपेक्षित तपासण्या करणे शक्य नाही.

(६) अन्न व औषध प्रशासनातील औषध निरीक्षक, गट-ब या संवर्गातील रिक्त पदे तातडीने भरण्याकरीता शासन पत्र दिनांक१२.०२.२०२५ अन्वये एकूण १०९ पदांच्या पदभरती करण्याबाबतचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आले असून, त्यानुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने औषध निरीक्षकांच्या एकूण १०९ पदांच्या पदभरतीबाबत दिनांक२९.०७.२०२५ रोजी जाहिरात क्र.११६/२०२५ प्रसिध्द केली आहे. याबाबत, पुढील कार्यवाही महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत करण्यात येत आहे. तसेच, प्रिस्क्रीप्शनशिवाय औषधांच्या विक्री करणाऱ्या आस्थापनांविरोधात औषधे व सौदर्यं प्रसाधने कायदा, १९४० व नियम १९४५ अन्वये नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येत आहे.

येवला (जि.नाशिक) नगरपरिषद क्षेत्रात क्षेत्रविकास कार्यक्रम राबविण्यासाठी अनुदान वितरीत करण्याबाबत

(२) २३० (३०-०४-२०२५). : सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) येवला (जि.नाशिक) नगरपरिषद क्षेत्रातील अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रात क्षेत्रविकास कार्यक्रम राबविण्यासाठी असलेल्या योजनेमधून पूर्ण झालेल्या कामांसाठी अनुदान वितरीत करण्याची मागणी जिल्हाधिकारी, नाशिक यांनी दिनांक २३ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्या दरम्यान शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक जिल्हाधिकारी यांना प्रलंबित अनुदान तातडीने देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी मा.मंत्री अल्पसंख्याक विकास यांना दिनांक २४ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्या दरम्यान निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

ॲड. माणिकराव कोकाटे (१३-११-२०२५) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) जिल्हाधिकारी, कार्यालय, नाशिक यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रविकास योजनेंतर्गत सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पित निधीपैकी उपलब्ध निधीमधून शासन निर्णय दिनांक ३० मार्च, २०२५ अन्वये रु.१.४८ कोटी इतका निधी वितरित करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांची दुरुस्ती करण्याबाबत

(३) ५२९ (१६-०४-२०२५). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा, कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील ७३४ शाळांची दुरुस्ती करण्याकरिता जिल्हा परिषदेकडे पाठविण्यात आलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे व त्यानुसार शासनाने कोणती

वि.स. २१ (3)
कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (२९-१०-२०२५) : (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

अकोला जिल्हयातील खेळाडूसाठी वसंत देसाई मैदानावर सिंथेटिक ट्रॅक तयार करण्याबाबत

(४) १५१७ (०५-०५-२०२५). श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्हयातील खेळांडूसाठी वसंत देसाई मैदानावर सिंथेटिक ट्रॅक तयार करण्याबाबत राज्य शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आठ लेन असलेला हा सिंथेटिक ट्रॅक ॲथलेटिक्सच्या खेळांडूसाठी वरदान ठरणार असल्याने या प्रस्तावास शासनाने मंजूरी दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. माणिकराव कोकाटे (०३-११-२०२५) : (१) होय.
(२) शासनपत्र दिनांक ११.०३.२०२५ अन्वये जिल्हा क्रीडा संकुल (स्व वसंत देसाई स्टेडियम), अकोला येथे ४०० मीटर सिंथेटीक ट्रॅकचा प्रस्ताव केंद्रशासनास (खेल मंत्रालय) पाठविण्यास शासनाद्वारे शिफारस करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

कोल्हापूर जिल्ह्यातील आंतरराष्ट्रीय हॉकी स्टेडियम प्रलंबित असल्याबाबत

(५) १६९० (०५-०५-२०२५). श्री.संजय केळकर (ठाणे) : सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर महापालिकेच्या दुर्लक्षामुळे कोल्हापूरातील आंतरराष्ट्रीय हॉकी स्टेडियम प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पहिल्या टप्प्यातील उर्वरित कामे पूर्ण होऊन दुसऱ्या टप्प्यातील कामांचे प्रस्तावकेंद्र सरकारकडे अद्याप पाठवले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोल्हापूरच्या ३५० हून अधिक खेळाडूंनी राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत प्रतिनिधित्व करत चमकदार कामगिरी केली असताना देखील हॉकी स्टेडियम प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून स्टेडीयमचे काम तातडतीने पुर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. माणिकराव कोकाटे (०३-११-२०२५) : (१), (२), (३) व (४) केंद्र सरकारच्या खेलो इंडिया' या राष्ट्रीय क्रीडा विकास योजनेअंतर्गत कोल्हापूर महानगरपालिकेच्या अधिनस्त मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियम साठी हॉकी

मैदानाच्या विकासासाठी केंद्र शासनाकडून रु.५.५० कोटींचा प्रकल्प मंजूर करण्यात आला आहे. त्यापैकी रु.३.८७ कोटी निधी केंद्र शासनाने वितरीत केला असून, कोल्हापूर महानगरपालिकेकडून रु.१.२९ कोटी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. सद्यास्थितीत प्राप्त निधीच्या माध्यमातून आधुनिक हॉकी मैदान तयार करण्यासाठी ॲस्ट्रो टर्फ युक्त मैदान,स्प्रिंकलर सिस्टीम,पेव्हिंग ब्लॉक्स,इतर संबंधित पायाभूत सुविधा पूर्ण करण्यात आलेली आहेत. सदर स्टेडियमसाठी International Hockey Federation (FIH) कडून मानांकन मिळविण्याची प्रक्रिया सुरू आहे. प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यातील अत्यावश्यक सुविधापूर्ण करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

खर्डी (ता. शहापूर जि.ठाणे) येथील क्रीडा संकुलाचे काम प्रलंबित असल्याबाबत

(६) १७०२ (०५-०५-२०२५). श्री.संजय केळकर (ठाणे) : सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खर्डी (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील दोन हेक्टर शासकीय जमिनीवर साकारले जाणारे क्रीडा संकुलाचे काम मागील आठ वर्षांपासून प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, क्रीडा संकुलाचे काम लवकरात लवकर सुरू करून खेळासाठी खुले करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. माणिकराव कोकाटे (०८-१०-२०२५) : (१), (२) व (३) मौजे खर्डी, ता. शहापूर, जि. ठाणे येथील स.नं. २६१/अ, क्षेत्र १५.२६.५३ हे.आर. या शासकीय जमिनीवर तालुका क्रीडा संकुल उभारणीसाठी क्रीडा संकुल समितीने दिनांक १९.१०.२०१५ रोजी तहसिलदार, शहापूर यांचेकडे जागेच्या उपलब्धतेबाबत मागणी सादर केली होती. सदर मागणीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक ०२.०८.२०२३ रोजीच्या पत्रान्वये २.०० हे.आर. क्षेत्र तालुका क्रीडा संकुलासाठी वर्ग करण्याचा आदेश निर्गमित केला आहे.सदर जागेवर काही अतिक्रमणे असल्याचे निदर्शनास आले असून, त्याबाबत मोजणी कार्यवाही प्रगतिपथावर आहे. जागेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने संरक्षण भिंत बांधण्याकरिता रु.१३८.४८ लक्ष निधीची मागणी जिल्हा नियोजन समितीकडे करण्यात आली होती. त्यानुसार जिल्हा वार्षिक योजना २०२३-२४ अंतर्गत प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. क्रीडा संकुल उभारणीसाठी आवश्यक पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

उच्च शिक्षणातील शिष्यवृत्तीचा थेट लाभ हस्तांतरणासाठी महाडीबीटी संकेत स्थळावरील प्रलंबित अर्ज निकाली काढण्याबाबत

(७) १८५५ (०५-०५-२०२५). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

वि.स. २१ (5)

(१) उच्च शिक्षणातील शिष्यवृत्तीचा थेट लाभ हस्तांतरणासाठी महाडीबीटी संकेत स्थळावर गेल्या ३ वर्षापासून अर्ज प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रलंबित अर्जाबाबत प्रश्न उदभवल्यास संबंधित विद्यापीठांचे कुलसचिव, महाविद्यालयांचे प्राचार्य यांना जबाबदार धरण्यात येणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रलंबित असलेल्या अर्ज निकाली काढण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१८-०९-२०२५) : (१) व (२) हे खरे आहे.

(३) सन २०२१-२२, सन २०२२-२३ व सन २०२३-२४ या तीन वर्षातील मिळून महाविद्यालयस्तरावर १८,७१४ आणि विभागस्तरावर २२,२७९ शिष्यवृत्ती अर्ज पडताळणीसाठी प्रलंबित असल्याचे माहे, एप्रिल, २०२४ मध्ये निदर्शनास आले होते. विद्यार्थ्यांनी अर्ज सादर करताना आवश्यक कागदपत्रे न जोडणे, चुकीचे कागदपत्रे ऑनलाईन सादर करणे इ. बाबींमुळे शिष्यवृत्तीचे काही अर्ज पडताळणीसाठी प्रलंबित राहतात. तथापि सदर अर्ज तातडीने पडताळणी करण्याचे निदेश दिल्यानंतर दिनांक ४.६.२०२५ पर्यंत महाविद्यालय स्तरावर १४६२७ व विभागस्तरावर २२,०८९ अर्जांची पडताळणी पुर्ण करण्यात आली आहे. उर्वरीत अर्जांपैकी महाविद्यालय स्तरावरील ४०८७ व विभागस्तरावरील १९० शिष्यवृत्ती अर्जांची पडताळणी सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात शासकीय व विद्यापीठ क्रीडा स्पर्धत जखमी झालेल्या खेळाडूंसाठी औषधोपचाराचा खर्च मिळणेबाबत

(८) २४९० (०५-०५-२०२५). डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले) : सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासकीय व विद्यापीठ क्रीडा स्पर्धा सुरु असताना जखमी झालेल्या खेळाडूंसाठी औषधोपचाराचा खर्च करण्याची मागणी अनेक खेळाडूंकडून होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास राज्यातील शासकीय क्रीडा स्पर्धा व विद्यापीठ क्रीडा स्पर्धांमध्ये जखमी झालेल्या खेळाडूंसाठी औषधोपचाराचा खर्च देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. माणिकराव कोकाटे (१९-०९-२०२५) : (१) होय.

(२) दिनांक २१ जून, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह योजनेअंतर्गत सर्व विद्यार्थ्यांना कोणत्याही कारणाने जखमी झाल्यास सानुग्रह अनुदान अनुज्ञेय आहे. सदरची योजना इयत्ता १ली ते १२ वी पर्यंत शिकणाऱ्या सर्व मुला-मुलींना लागू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

अहिल्यानगर जिल्हयातील स्वस्त धान्य दुकानदारांना धान्याचे कमिशन न मिळाल्याबाबत

(९) २७२३ (२८-०४-२०२५). श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

वि.स. २१ (6)

(१) केंद्र शासन व राज्य शासन यांच्या निर्णयानुसार अहिल्यानगर जिल्हयातील स्वस्त धान्य दुकानदारांनी सन २०२२ -२०२३ या कोरोना महामारीच्या काळात मोफत धान्य वितरण केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यातील केंद्र शासनाचे धान्य वाटप हे कॅरी फॉरवर्ड म्हणून आले, त्याचे कमिशन स्वस्त धान्य दुकानदारांना अद्याप मिळालेले नाही हे ही खरे आहे काय,

(३) राज्य शासनाच्या निर्णयानुसार माहे मे २०२१ मध्ये मोफत धान्य वितरण केले तसेच माहे जानेवारी २०२३ मध्ये केंद्र शासनाच्या निर्णयानुसार मोफत धान्य वितरण केले त्याचे कमिशन स्वस्त धान्य दुकानदारांना अद्याप मिळालेले नाही हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. छगन भुजबळ (१४-०८-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) हे अशंत: खरे आहे.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना व प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेअंतर्गत मे, २०२१ या १ महिन्यासाठी अन्न धान्याचे मोफत वाटप करण्यात आले होते त्याचे मार्जिन वाटप करण्यात आले आहे. तसेच माहे जानेवारी, फेब्रुवारी २०२३ करीताचे मार्जिन वाटपाचा निधी दिनांक २८ मार्च, २०२३ रोजी जिल्हा पुरवठा अधिकारी, अहिल्यानगर यांना उपलब्ध करुन दिलेला आहे.

तथापि, शिधावस्तूंचे वितरण करण्याकरीता एनआयसी द्वारे AePDS प्रणाली विकसीत करण्यात आली आहे. सदर प्रणालीवर अन्नधान्य वितरणाची माहिती केंद्र शासनाच्या Central Repository मध्ये अद्यावत करण्यात येते. सन २०२१-२२ व २०२२-२३ या कालावधीमध्ये वितरीत केलेल्या अन्नधान्याची माहिती उपलब्ध होऊ शकलेली नाही. यासंदर्भात उक्त कालावधीतील माहिती Central Repository मध्ये अद्यावत करण्यास मान्यता प्राप्त करुन घेण्याच्या अनुषंगाने केंद्र शासनाकडे पत्रव्यवहार सुरु आहे.

५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील भूकंपग्रस्त प्रमाणपत्र धारकांना शिक्षक पात्रता परीक्षेमध्ये सवलत देणेबाबत

(१०) २८४१ (०५-०५-२०२५). श्री.अभिमन्यु पवार (औसा) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील भूकंपग्रस्त प्रमाणपत्र धारकांना शिक्षक पात्रता परीक्षेमध्ये (टीईटी) मध्ये १५ टक्के गुणांची सवलत देणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी (औसा) सचिव, मा.शालेय शिक्षण मंत्री यांना दिनांक १२ सप्टेंबर, २०२४ रोजी वा त्यादरम्यान निवेदनद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीनुसार सदरहू प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (३०-१०-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) याअनुषंगाने शिक्षण संचालक (प्राथमिक) यांचे अभिप्राय मागविण्यात आले असून, त्याअनुषंगाने त्यांचेकडून माहिती प्राप्त झालेली आहे. सदरची मागणी तपासून याबाबत यथोचित निर्णय घेण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

सरस्वती कन्या प्रशाळा औसा (जि.लातूर) या शाळेतील कर्मचाऱ्यांचे इतर शाळेत समायोजन

करण्याबाबत

(११) २८५३ (२८-०४-२०२५). श्री.अभिमन्यु पवार (औसा) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सरस्वती कन्या प्रशाळा (ता.औसा, जि.लातूर) या शाळेतील लिपिक श्री.उमेश पवार व इतर कर्मचाऱ्यांचे इतर शाळेत समायोजन करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी (औसा) तत्कालीन शालेय शिक्षण मंत्री यांना दिनांक ३ ऑगस्ट, २०२४ रोजी वा त्यादरम्यान निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (१५-१०-२०२५) : (१) होय, खरे आहे.

(२) सदर शाळेचे अनाधिकृत स्थलांतर झाल्याने व पटसंख्ये अभावी सदर शाळेचे अनुदान बंद करुन विनाअनुदानित करण्यात आले आहे. त्यामुळे श्री.उमेश पवार (कनिष्ठ लिपिक) हे वेतनासाठी मा.शाळा न्यायाधिकरण लातूर येथे याचिका क्र.१६/२०२३ अन्वये अपील केले असता मा.शाळा न्यायाधिकरणाने अपील फेटाळले. या विरोधात श्री. उमेश पवार (कनिष्ठ लिपिक) यांनी मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका क्र.१८०९०/२०२४ दाखल केली असून सदरील प्रकरण सदयस्थितीत न्यायप्रविष्ठ आहे.

३) प्रकरण सदयस्थित न्यायप्रविष्ठ आहे.

शासकीय तंत्रनिकेतनांमधील तासिका तत्वावरील अभ्यागत अधिव्याख्यात्यांना सेवेत कायम करणेबाबत

(१२) २८६९ (०५-०५-२०२५). श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय तंत्रनिकेतनांमधील तासिका तत्वावरील अभ्यागत अधिव्याख्यात्यांना सेवेत कायम करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी (औसा) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक २९ ऑगस्ट, २०२४ रोजी वा त्यादरम्यान आढावा बैठकीत मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने यावर कोणतीच कार्यवाही केलेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०१-०७-२०२५) : (१) होय.

(२), (३) व (४) शासकीय अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये व शासकीय तंत्रनिकेतने व तत्सम पदविका संस्थेतील अध्यापकांची पदभरती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील आहे. तासिका तत्वावर कार्यरत असलेल्या उमेदवारांच्या सेवा नियमित रिक्त पदांवर किंवा पूर्ण वेळासाठी घेण्यात आलेल्या नाहीत. तासिका तत्वावर नियुक्त अध्यापकांनी त्यांच्या सेवा नियमित करण्यासाठी दाखल केलेल्या रिट याचिका क्र.३९१/२०२३ मध्ये मागणी मान्य करणे शक्य नसल्याचे शासनाच्या वतीने प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आलेले आहे. सबब, तासिका तत्वावर कार्यरत असलेल्या उमेदवारांच्या मागण्यांबाबतचे प्रकरण न्याय प्रविष्ठ असल्याने याबाबत मा.न्यायालयाच्या निर्णयानुसार कार्यवाही करणे योग्य राहील.

तालुका क्रीडा संकुल, अंबाजोगाई (ता.जि. बीड) येथील सन २०२४-२५ निधी वितरण प्रस्तावास मंजुरी

देणेबाबत

(१३) ३०५२ (०५-०५-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात तालुका क्रीडा संकुल, अंबाजोगाई, (ता.जि.बीड) येथे विविध विकास कामांसाठी ३.०० कोटी रुपयांचा निधी मिळण्यासाठीचा प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकारी, बीड यांनी दिनांक २५ जून, २०२४ रोजीच्या पत्रान्वये मंजुरीसाठी आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांच्याकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावास मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी राज्याचे क्रीडा मंत्री यांच्याकडे दिनांक ५ ऑगस्ट, २०२४ रोजी वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. माणिकराव कोकाटे (०२-१०-२०२५) : (१) होय.

(२) होय.

(३) शासन निर्णय दिनांक २३.३.२०२२ नुसार सदर क्रीडा संकुलास रु.३००.०० लक्ष अनुदान मर्यादा आहे. क्रीडा संचालनालयाच्या दिनांक ५ मार्च २०२५ रोजीच्या पत्रान्वये रु.१.०० कोटी निधी तालुका क्रीडा संकुल, अंबाजोगाई साठी वितरीत करण्यात आला आहे. क्रीडा संकुल समितीने सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यासाठी वास्तुविशारदाला निर्देश दिले आहेत. सदर सुधारित आराखडांना तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतर शासन निर्णय दिनांक २३.३.२०२२ अन्वये पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यीत शाळा अधिनियमाची अंमलबजावणी करणेबाबत

(१४) ३१०८ (०५-०५-२०२५). श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यीत शाळा मान्यतेकरीता शाळा अधिनियमातील सुधारीत अटींकडे शासन हेतूपुरस्पर दुलर्क्ष करीत असून संस्था चालकांना नाहक त्रास देत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरी किंवा ग्रामीण क्षेत्रातील शाळेच्या मान्यतेकरीता १ एकर जागेची अट असून सुधारणा विधेयक २०१२ नुसार विकास आराखड्यास सक्षम प्राधिकरणाने अनुसूची "क" च्या नोंद (१२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचा भूखंड शैक्षणिक प्रयोजनाकरीता राखून ठेवला असेल तर जागेची अट शिथील करावी असा स्पष्ट उल्लेख केला असून सुध्दा त्यांची अंमलबजावणी करण्यास शिक्षण विभागाचे अधिकारी टाळाटाळ करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक शाळांचे प्रस्ताव देखील प्रलंबीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (३०-१०-२०२५) : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन), अधिनियम २०१२ मधील सुधारणेनुसार ग्रामीण भागात नव्याने शाळा स्थापन करण्यासाठी १ एकर जागेची अट आहे. तसेच, उक्त अधिनियमात दिनांक २१.०८.२०१३ रोजी केलेल्या सुधारणेनुसार जर विकास आराखड्यामध्ये सक्षम प्राधिकरणाने अनुसूची क च्या नोंद (१२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचा भुखंड शैक्षणिक प्रयोजनासाठी राखून ठेवला असेल तर अशा बाबतीत विहित केलेल्या जमिनीच्या क्षेत्रासंबंधातील अट शिथील करता येईल अशी तरतूद करण्यात आलेली आहे. तथापि, बालकांचा मोफत व शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील तरतूदीनुसार बालकांना गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण देण्याच्या दृष्टीने किमान मुलभूत सुविधाबाबत शासन निर्णय, दिनांक२९.०६.२०१३ अन्वये विहित केलेले निकषांची पूर्तता होणे आवश्यक आहे.

(३), (४) व (५) स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर शाळांना मान्यता देण्याबाबतचे प्रस्ताव मोठ्या प्रमाणात शासनाकडे प्राप्त होत आहेत. त्यामुळे काही प्रमाणात प्रस्ताव प्रलंबित राहत आहेत. सदर प्रस्तावाचा तातडीने निपटारा करण्याची कार्यवाही शासन स्तरावरून सुरू आहे.

शाळांतील मुख्याध्यापक पद मंजुरीच्या निकषांतील बदल, त्याचे परिणाम व सुधारित संच मान्यतेबाबत

(१५) ३१९७ (०५-०५-२०२५). श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्री.प्राविण विरभद्रया स्वामी (सर) (उमरगा) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व व्यवस्थापनांच्या शाळांमधील संच मान्यतेचे सुधारित निकष शासनाच्या दिनांक १५ मार्च, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सुधारित निकषांनुसार शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या कमी असल्यास मुख्याध्यापक पद मंजूर केले जात नाही व यामुळे शाळेतील कार्यालयीन व शैक्षणिक कामकाजावर, शाळेच्या प्रशासन व अध्यापन कार्यावर प्रतिकूल परिणाम होत असून कोकण विभागातील ग्रामीण भागातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी मुख्याध्यापक पद असणे आवश्यक आहे, सुधारित संच मान्यता निकषांमुळे वरिष्ठ शिक्षकांवर अतिरिक्त प्रशासकीय कार्यभार टाकण्यात येत असून, याचा त्यांच्या अध्यापनावर परिणाम होत असून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत घट होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे हि खरे आहे काय,

(३) असल्यास, प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांमध्ये पटसंख्या १३५ पेक्षा कमी असल्यास मुख्याध्यापक पदाची मंजुरी रद्द केली जात असल्यामुळे मातृभाषेतून शिक्षण घेणाऱ्या शाळांवर इंग्रजी शाळांच्या अतिक्रमणामुळे संख्यापूर्तीचे संकट निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विविध शिक्षक संघटनांनी विरोध नोंदवून सदर शासन निर्णय रद्द करण्याची लेखी मागणी मा. मुख्यमंत्री यांच्याकडे माहे मार्च, २०२४ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, सुधारित निकषांमुळे प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी शाळांमध्ये मुख्याध्यापक पदाच्या मंजुरीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (१५-१०-२०२५) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) हे अशंत: खरे आहे.

दिनांक १५.०३.२०२४ च्या शासन निर्णयान्वये संचमान्यतेचे सुधारीत निकष विहित करण्यात आले आहेत. त्यामध्ये दिनांक १९.०९.२०२४ व दिनांक ०९.१०.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारणा

करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

कृष्णा कोयना उपसा सिंचन (ता.जत, जि.सांगली) योजनेस निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(१६) ३५६३ (३०-०४-२०२५). श्री.गोपिचंद पडळकर (जत) : सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कृष्णा कोयना उपसा सिंचन (ता.जत, जि.सांगली) योजनेंतर्गत म्हैसाळ विस्तारित जत उपसा सिंचन योजनेमुळे ३८००० हेक्टर इतके क्षेत्र ओलिताखाली येणार हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामांसाठी रुपये २००८ कोटींच्या निविदा प्रगतीत असून सदर योजनेसाठी सन २०२४-२५ अंतर्गतचा निधी पूर्ण खर्च झाला असून सदर कामांच्या पूर्णत्वासाठी रुपये ५५० कोटी इतक्या निधीची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कामांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री यांचेकडे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवदेनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१७-१०-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) कृष्णा कोयना उपसा सिंचन योजनेंतर्गत म्हैसाळ विस्तारित जत उपसा सिंचन योजनेसाठी रु.१०२८.६८ कोटी व रु.९७९.३५ कोटी असे एकुण रु.२००८.०३ कोटी किंमतीच्या निविदा प्रगतीपथावर आहेत. सन २०२४-२५ करीता अर्थसंकल्पीय तरतूद रु.५१७.५० कोटीची व पुरवणी मागणीद्वारे रू.२७५ कोटी तरतुदीपैकी मार्च, २०२५ अखेर एकूण रु.५५४.३२ कोटी खर्च झाले आहेत.
(३) होय, हे अंशत: खरे आहे.
सदर कामांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. उपमुख्यमंत्री तथा मंत्री (वित्त व नियोजन) यांच्याकडे केली आहे.
(४) कृष्णा कोयना उपसा सिंचन योजनेकरीता मार्च-२०२५ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये पुरवणी मागणीद्वारे रू.२७५ कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला होता. सदर निधी आभासी स्वीय प्रपंजी प्रणालीवर (PLA) मार्च-२०२५ अखेर खर्च न झाल्याने सदर प्रकरणी सक्षम स्तरावर मान्यतेनंतर दिनांक ३१.०५.२०२५ पर्यंत निधी खर्च झाला आहे.
सन २०२५-२६ मध्ये कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्पासाठी रू.४५०.८३ कोटी इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्य शासनाच्या शाळांमध्ये डीएड व बीएड **शिक्षकांच्या भरतीबाबत**

(१७) ३८४३ (०५-०५-२०२५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यभरात सुमारे ६ हजार शाळा असून त्यापैकी ज्या शाळांमध्ये जागा रिक्त असतील तेथे शिक्षक पात्रता परिक्षा उत्तीर्ण झालेल्या शिक्षकांची रितसर भरती करण्याऐवजी शासनाने डीएड व बीएड झालेल्या शिक्षकांची कंत्राटीपद्धतीने तात्पुरती नियुक्ती करण्याचा निर्णय माहे सप्टेंबर, २०२४ मध्ये घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उक्त निर्णयानुसार २० किंवा त्यापेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांमधील डीएड व बीएड झालेल्या २ पैकी १ शिक्षक कंत्राटी पद्धतीने दरमहा १५ हजारांच्या मोबदल्यावर नेमण्याच्या निर्णयाविरुद्ध राज्यभरातील शिक्षक संघटनांनी या निर्णयास तीव्र विरोध करुन राज्यव्यापी आंदोलने करुन निषेध व्यक्त केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासन नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण, सीबीएसईच्या धर्तीवर अभ्यासक्रम व राज्यभरातील सर्व शाळांमध्ये लागू करत असताना १५ हजार रुपये मासिक मानधनावर शिक्षक नेमून शिक्षणाचे कंत्राटीकरण करण्याबाबतची योजना राबविण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार नियमीत शिक्षक नेमण्याबाबत कोणती कर्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (१७-१०-२०२५) : (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

(३) व (४) कमी पटसंख्या असलेल्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरीता २० व २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांवर मंजूर दोन शिक्षकांपैकी एक सेवानिवृत्त शिक्षक /डीएड बीएड अर्हताधारक बेरोजगार शिक्षकाची मानधनावर कंत्राटी तत्वावर नियुक्त करणेबाबतचा निर्णय दिनांक ०५.०९.२०२४ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला होता. तसेच दिनांक २३.०९.२०२४ च्या शासन निर्णयान्वये सदरचा शासन निर्णय अधिक्रमित करुन, १० व १० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांवर कंत्राटी तत्वावर शिक्षक नियुक्ती करणेबाबत निर्णय घेण्यात आला. तथापि, शिक्षक भरतीचा दूसरा टप्पा सुरु झाला असल्याने पवित्र पोर्टलमार्फत नियमित शिक्षकांची नियुक्ती होणार आहे. यास्तव उक्त दिनांक ०५.०९.२०२४ व दिनांक २३.०९.२०२४ चे शासन निर्णय दिनांक १०.०२.२०२५ च्या शासन निर्णयान्वये अधिक्रमित करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील रात्रशाळांना विशेष दर्जा देण्याबाबत

(१८) ४२५३ (०५-०५-२०२५). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्थिक प्रतिकूल परिस्थितीचा सामना करत असलेल्या विद्यार्थांमधील शिक्षणाची उत्कंठा कायम ठेवणाऱ्या मुंबईतील रात्रशाळांना विशेष दर्जा देण्याची मागणी छात्रभारती या शिक्षक-विद्यार्थी संघटनेमार्फत केली जात असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शाळांना मुखबधिरांच्या शाळा, अंधशाळा, मानसिक दुर्बलांच्या शाळा याप्रमाणे विशेष शाळेचा दर्जा देण्यात यावा अशी मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कमाल १० विद्यार्थांना १ शिक्षक, बालकांसाठी रात्र बहुजन योजना, ३ तासांची रात्र शाळा पूर्णवेळ करणे, शिक्षकांना आठवड्याचे कामकाज १२ तासांहून अधिक नसावे इत्यादी मागण्या संघटनामार्फात होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रात्रशाळांमध्ये मोठ्या प्रमाणात शिक्षण घेणाऱ्या गरीब व गरजू विद्यार्थांना शैक्षणिक लाभ मिळण्याकरिता सदरहू संघटनांकडून होत असणाऱ्या मागण्या पूर्ण करण्याकरिता शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (१६-१०-२०२५) : (१) व (२) याबाबतची मागणी होत आहे.
(३) व (४) रात्रशाळा धोरण विहीत करण्याकरिता आयुक्त (शिक्षण) यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून, उक्त समितीचा अंतिम अहवाल प्राप्त होताच याबाबत सुधारित रात्रशाळा धोरण विहीत करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

अकोले (जि.अहिल्यानगर) तालुक्यातील पिंपळगाव खांड धरणाच्या कामास व वाढीव पाणी वापरास मान्यता मिळण्याबाबत.

(१९) ४४५० (३०-०४-२०२५). डॉ.किरण लहामटे (अकोले) : सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोले (जि.अहिल्यानगर) तालुक्यातील पिंपळगाव खांड धरणाची उंची गोडबोले प्रकारचे गेट टाकून वाढवणेबाबतच्या कामास व वाढीव पाणी वापरास मान्यता मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) जलसंपदा मंत्री व अप्पर मुख्य सचिव, जलसंपदा विभाग यांच्याकडे सन २०२४ पासून लेखी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतचा प्रस्ताव उपअधीक्षक अभियंता सिंचन भवन छत्रपती संभाजीनगर यांनी अपर मुख्य सचिव जलसंपदा विभाग यांच्याकडे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी वाढीच पाणी वापरास मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१७-१०-२०२५) : (१) होय.
(२) होय.
(३) पिंपळगाव खांड धरणाची उंची गोडबोले प्रकारचे गेट टाकून वाढविणेबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त असून त्याबाबतची उचित कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
४) प्रश्न उद्‌भवत नाही.

कोल्हापूर येथील निवासी फुटबॉल प्रशिक्षण केंद्र पूर्ववत करण्याबाबत

(२०) ४४९७ (२९-०४-२०२५). श्री.राजेश क्षिरसागर (कोल्हापूर उत्तर) : सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूरच्या क्रीडा प्रबोधनी मध्ये कुस्ती व फुटबॉल निवासी प्रशिक्षण केंद्रास राज्य शासनाने माहे जुलै, १९९६ मध्ये मंजूरी दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही वर्षानंतर फुटबॉल निवासी केंद्र पुणे क्रीडा प्रबोधनी येथे स्थलांतरित केल्यामुळे कोल्हापुरातील स्थानिक खेळाडूंना तंत्र शुद्ध प्रशिक्षणा अभावी राहवे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, देशात तिसऱ्या क्रमांकाचा प्रेक्षक वर्ग असणाऱ्या आणि हजारो खेळाडूंची नोंदणी होणाऱ्या कोल्हापूर जिल्ह्यातील क्रीडा प्रेमींकडून निवासी फुटबॉल केंद्र पूर्ववत कोल्हापूर येथे सुरु करण्याबाबत शासनाकडे मागणी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कोल्हापूर येथे निवासी फुटबॉल प्रशिक्षण केंद्र पूर्ववत सुरु करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. माणिकराव कोकाटे (०३-११-२०२५) : (१) होय.

शासन निर्णय दिनांक १८ नोव्हेंबर, १९९५ अन्वये सन १९९६-९७ पासून शिवाजी स्टेडियम, कोल्हापूर येथे कुस्ती, शुटिंग आणि फुटबॉल क्रीडा प्रबोधिनी सुरु करण्यात आली होती.

(२) होय.

सुयोग्य निवास व फुटबॉल सरावासाठी आवश्यक नैसर्गिक मैदान उपलब्ध नसल्याने फुटबॉल प्रशिक्षण केंद्र सन २००० मध्ये पुणे येथील क्रीडा प्रबोधिनी मध्ये स्थलांतरीत करण्यात आले.

(३) होय.

(४) दिनांक १२ फेब्रुवारी, २०२५ रोजी मा. मंत्री (क्रीडा व युवक कल्याण), महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या उच्चस्तरीय धोरण समितीच्या बैठकीमध्ये कोल्हापूर येथे फुटबॉल क्रीडा प्रबोधिनी पुन्हा सुरू करण्यास तत्त्वतः मान्यता देण्यात आली. या प्रबोधिनीमध्ये ३० प्रशिक्षणार्थ्यांसाठी निवास, भोजन व शैक्षणिक सुविधा दर्जेदार स्वरूपात उपलब्ध करून देण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली आहे. प्रशिक्षणासाठी सुयोग्य व नैसर्गिक गवताचे फुटबॉल मैदान उपलब्ध होणे अनिवार्य असल्यामुळे यासाठी स्थानिक पातळीवर कराराद्वारे पूर्तता करण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील फुटबॉल प्रशिक्षण केंद्र पुनरारंभासाठी प्रयत्न सुरू असून, आवश्यक सुविधा उपलब्ध झाल्यानंतर सदर क्रीडा प्रबोधिनी कार्यान्वित करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात खासगी अनुदानित शाळांमधील पद भरतीबाबत

(२१) ४५२० (०५-०५-२०२५). श्री.निलेश राणे (कुडाळ) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात खासगी अनुदानित शाळांमध्ये शिक्षकेतर कर्मचारी विशेषत: लिपिक संवर्गातील कर्मचारी भरती प्रक्रिया सिंधुदुर्गातील शिक्षण विभागाच्या दुर्लक्षामुळे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयात अनेक वर्षे शाळांमध्ये रिक्त असणारी लिपिक संवर्गातील भरती प्रक्रिया प्रलंबित असताना या रिक्त पदांवर शिक्षण संस्थांनी आपल्या स्तरावर नेमलेल्या लिपिक पदांचे प्रस्ताव शिक्षण विभागाने कोणतीच कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर लिपिकांची समायोजन प्रक्रिया आणि रिक्त असलेली लिपिक पदे यांच्यामध्ये शैक्षणिक संस्थांनी नेमलेले लिपिक अडकले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सिंधुदुर्गातील प्रलंबित लिपिक पदांच्या भरतीबाबत ठोस निर्णय घ्यावा अशी मागणी संस्था स्तरार नियुक्त केलेल्या आणि शासनाच्या मान्यतेच्या प्रतिक्षेत असलेल्या लिपिकांकडून केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (१७-१०-२०२५) :(१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) हे खरे आहे.
(५) मा.न्यायालयाने शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे आकृतीबंधास स्थगिती दिल्याने पदे भरण्यात येत नव्हती. सदरची स्थगिती उठली असून, सदरची पदे भरण्याचा मार्ग उपलब्ध झालेला आहे. तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी यांची पदे काही अटींच्या अधिन राहून १०० टक्के पदे सरळसेवेने भरण्याबाबतचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे यांचेकडून दिनांक २८.०५.२०२५ च्या पत्रान्वये सन २०२४-२५ ची संचमान्यता पूर्ण झाल्यावर रिक्त पदांचा आढावा घेऊन अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन पूर्ण झाल्यानंतर शिक्षकेत्तर कर्मचारी पदभरतीबाबत निर्णय घेतला जाईल तोपर्यंत कोणत्याही प्रकारची शिक्षकेत्तर भरती करण्यात येऊ नये, असे कळविण्यात आले आहे. त्यानुसार याबाबत यथोचित निर्णय होऊन सदरची पदे लवकरात लवकर भरण्याबाबत शासन प्रयत्नशील आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

औषध निर्माणशास्त्र शाखेतील पदविका प्राप्त विद्यार्थ्यांच्या परीक्षाबाबत

(२२) ४६९२ (०५-०५-२०२५). श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औषध निर्माणशास्त्र शाखेतील पदविका प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया या शिखर संस्थेने परिक्षा देणे बंधनकारक केले असून सन २०२४ या वर्षात ही परीक्षा घेण्यात आली नाही, त्यामुळे फार्मसी पदविका प्राप्त विद्यार्थ्यांना त्यांचे पुढील भविष्याचे नियोजन करण्यात अडचणी येत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या परीक्षा वेळेत घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. २१ (15)

श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (२६-०८-२०२५) : (१) अंशतः खरे आहे

फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया (पीसीआय) या शिखर परिषदेने दिनांक २४.२.२०२२ रोजीच्या अधिसूचनेद्वारे फार्मसी ॲक्ट १९४८ (१९४८ मधील ८) मधील कलम १० आणि १८ द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन केंद्र शासनाच्या मान्यतेने "डिप्लोमा इन फार्मसी एक्झीट एक्झामीनेशन रेग्युलेशन २०२२" हे विनियम घोषित केलेले आहे. त्यास अनुसरुन पदविका धारक विद्यार्थ्यांना राज्य फार्मसी कौन्सिलकडे फार्मासिस्ट म्हणून नोंदणी करण्यापूर्वी डिप्लोमा इन फार्मसी एक्झीट एक्झामीनेशन ही परीक्षा देणे आवश्यक केले आहे.

शै. वर्ष २०२२-२३ मध्ये प्रवेश घेतलेले विद्यार्थी २०२३-२४ या वर्षानंतर पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण होतात. या विद्यार्थ्यांकरिता पीसीआयद्वारे एक्झीट एक्झामीनेशन दिनांक ३, ४ व ५ ऑक्टोबर, २०२४ रोजी नियोजित केलेली होती. या परिक्षेच्या योजने संदर्भात पीसीआयद्वारे काही बदल केले होते व त्यास केंद्रिय आरोग्य मंत्रालयाची मान्यता प्रलंबित असल्याने या नियोजित परिक्षा पुढे ढकलत असल्याचे पीसीआय यांनी त्यांच्या दिनांक २७.०९.२०२४ च्या परिपत्रकाद्वारे सर्व संबधिताना कळविले आहे.

(२) एक्झीट एक्झामीनेशन परिक्षाचे नियोजन व अंमलबजावणी या बाबी राज्य शासनाच्या अधिकार क्षेत्रात येत नाहीत. याची सर्व जवाबदारी फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली या केंद्र शासनाच्या शिखर परिषदेची आहे. फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी याबाबत दिनांक ३१.१२.२०२४ रोजी परिपत्रक निर्गमित केलेले आहे. सदर परिपत्रकान्वये शै. वर्ष २०२२-२३ मध्ये प्रवेश घेतलेल्या व शै. वर्ष २०२३-२४ या वर्षामध्ये पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण होणा-या विद्यार्थ्यांना फार्मासिस्ट म्हणुन नोंदणीचे एका वर्षासाठीचे प्रमाणपत्र (एक्झीट एक्झामीनेशनचे आयोजन होईपर्यंत) देण्याबद्दल निर्देश देण्यात आले आहेत. तद्नंतर एक्झीट एक्झामीनेशन उत्तीर्ण होईपर्यंत नोंदणीचे प्रमाणपत्र नुतनीकरण न करण्याचे यात नमुद आहे. या करिता विद्यार्थ्यांनी पीसीआयद्वारे निर्धारित केलेल्या नमुन्यामध्ये प्रतिज्ञापत्र देणे आवश्यक आहे.

फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी दिनांक ०७.०८.२०२५ रोजीच्या परिपत्रकान्वये खालीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

All State Pharmacy Councils are hereby requested to issue registration certificate to the passed out students of २०२२-२३ admitted batch till the exit exam conducted as per the prescribed conditions u/s ३२(२) of Pharmacy Act ,१९४८.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात वक्फ मंडळाच्या अखत्यारीतील मालमत्ता तसेच जमिनींचे जिओ मॅपिंग करणेबाबत

(२३) ४७९३ (०५-०५-२०२५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) : सन्माननीय **अल्पसंख्याक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्वत्र विखुरलेल्या आणि कुठलेही अद्ययावत मोजमाप नसलेल्या वक्फ मंडळाच्या अखत्यारीतील मालमत्ता तसेच जमिनींचे जिओ मॅपिंग करण्याचा निर्णय अल्पसंख्याक विभागाने घेतला असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वक्फच्या मालमत्ता संस्थांना भाडेपट्ट्यावर देताना संबंधित जिल्ह्यातील वक्फ समिती भाडे ठरविते, परंतु त्यात कुठलीही सुसूत्रता नसल्यामुळे वक्फ मंडळाचा महसूल बुडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वफ्क मालमत्ता व त्यावरील अतिक्रमण तसेच या प्रक्रियेत सुसूत्रता आणण्यासाठी शासनाने

कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. माणिकराव कोकाटे (०६-११-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) वक्फ मालमत्ता भाडेपट्टयावर देण्यासाठी केंद्र शासनाने प्रसिध्द केलेल्या भाडेपट्टा नियम, २०१४ मधील तरतुदींचे पालन करणे बंधकारक आह. वक्फ संस्था सदर तरतुदींचे पालन करीत नसल्याचे स्पष्ट झाल्यास संबंधित संस्थेवर कारवाई करण्याची अधिनियमामध्ये तरतूद करण्यात आली आहे.
(३) वक्फ मालमत्तांच्या अभिलेख्यांमध्ये असलेल्या त्रुटी दूर करण्यासाठी तसेच वक्फ मालमत्तांचे कायमस्वरुपी जतन व नोंदी करण्यासाठी राज्यातील सर्व वक्फ मालमत्तांचे GIS Mapping करण्याचा निर्णय घेतलेला आहे .
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

शिक्षण सेवकांच्या मानधन वाढीबाबत

(२४) ५२७० (०५-०५-२०२५). श्री.प्राविण विरभद्रया स्वामी (सर) (उमरगा) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिक्षण सेवकांना दिले जाणारे मानधन तुटपुंजे असल्यामुळे शिक्षण संघटनांकडून मानधन वाढीची मागणी होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कायम स्वरूपी कर्मचाऱ्यांप्रमाणे महागाईभत्ता वाढीनुसार शिक्षणसेवकांचे मानधन वाढीचा प्रस्ताव विभागाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (१६-१०-२०२५) : (१) याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने निवेदने प्राप्त होत आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) शासन निर्णय दिनांक ०७.०२.२०२३ अन्वये शिक्षण सेवक यांचे मानधनात वाढ करुन प्राथमिक व उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक यांना अनुक्रमे रु.१६,०००/-, रु.१८,०००/- व रु.२०,०००/- या प्रमाणे मानधन वाढ करणेबाबतचा निर्णय घेण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील शालेय शिक्षण विभागाच्या सन २०२३ -२०२४ च्या संच मान्यता प्रलंबित असल्याबाबत

(२५) ५४२६ (०५-०५-२०२५). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शालेय शिक्षण विभागाचे सन २०२३ -२०२४ च्या संच मान्यता प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ३६०० शाळांमधील कार्यरत पदांची माहिती प्रलंबित असल्याने संचमान्यतेबाबत अनेक अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संच मान्यतेसाठी येणाऱ्या अडचणी दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (१५-१०-२०२५) : (१) सन २०२३-२४ या दिनांक ३०.११.२०२३ रोजी पटावर नोंद असलेल्या आधार वैध विद्यार्थी संख्येनुसार विभागाच्या संच मान्यता शिक्षणाधिकारी लॉगिनला उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. त्यावेळी ९६६ शाळांच्या संच मान्यता विविध कारणास्तव (व्यवस्थापन बदल, माध्यम बदल, विद्यार्थी चुकीच्या माध्यमामध्ये दर्शविणे, शाळा स्थलांतर, ॲडपोस्ट शाळास्तरावरील नमूद माहिती ड्राफ्ट स्वरुपात सेव्ह राहणे, अनुदान प्रकारानुसार पदे वर्ग न करणे इ.) प्रलंबित होत्या.
(२) वेळोवेळी होणाऱ्या मासिक आढावा बैठक, क्षेत्रीयस्तरावरील संच मान्यतेमधील तांत्रिक बाबी दुरुस्तीबाबत वेळोवेळी शिबीरांचे आयोजन करून सदर प्रलंबित संच मान्यतांबाबत कार्यवाही करण्यात येवून सद्यस्थितीत १३७ शाळांच्या विविध कारणास्तव संच मान्यता प्रलंबित आहे. त्यापैकी १४ शाळांच्या संच मान्यता कार्यरत पदे नमूद नसल्याने प्रलंबित आहे.
(३) संच मान्यता निर्गमित करणेसाठी क्षेत्रीयस्तरावर सदर शाळांच्या संच मान्यता निर्गमित होणेसाठी आवश्यकती कार्यवाही करणेसाठी संचालनालयाच्यावतीने वेळोवळी व्ही.सी. घेवून क्षेत्रीयस्तरावर सूचित करण्यात येत आहे.
(४) प्रश्नच उद्भवत नाही.

शाळेत प्रवेश मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांच्या पाल्यांची दलालांकडून फसवणूक होत असल्याबाबत

(२६) ५४९५ (०५-०५-२०२५). श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आपल्या पाल्यांना चांगल्या शाळेत प्रवेश मिळावा यासाठी पालकांचे प्रयत्न सुरु असताना बनावट दलालांकडून प्रवेशाच्या नावाखाली लाखो रुपये वसूल करून पालकांची फसवणूक केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शाळा प्रवेशाच्या नावाखाली फसवणूक करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, येत्या शैक्षणिक वर्षात शाळा प्रवेशासाठी विद्यार्थ्यांच्या पाल्यांची फसवणूक होऊ नये याकरीता शासनाने कोणती उपायायोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (१३-१०-२०२५) : (१)होय, हे खरे आहे.
के.जे. सोमय्या कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्स, एस. के. सोमय्या विनय मंदिर हायस्कूल ॲण्ड ज्युनियर कॉलेज, के.जे. सोमय्या कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड कॉमर्स, विद्याविहार, मुंबई या महाविद्यालयात बनावट गुणपत्रिका व शाळा सोडल्याचा दाखला सादर करुन विद्यार्थ्यांनी इयत्ता ११ वी मध्ये बेकायदा प्रवेश मिळविण्यासाठी पालकांची फसवणूक केल्याचे आढळून आले आहे.
(२) संबंधित प्रकरणांमध्ये दोषी आढळलेल्या कर्मचा-यास संस्थेने निलंबीत केले आहे. तसेच सदर प्रकरणामध्ये टिळकनगर पोलीस ठाणे येथे भारतीय न्याय संहिता २०२३ व माहिती व तंत्रज्ञान अधिनियम २००० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून या गुन्हयामध्ये एकुण १० आरोपींना अटक करण्यात आले आहे. त्यांच्याविरोधात

मा.प्रथम व न्यायदंडाधिकरी, विक्रोळी, मुंबई यांच्या न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले होते.
(३) २०२५-२०२६ पासून राज्यातील ११ वी इयत्तेचे सर्व प्रवेश ऑनलाईन माध्यमातून करण्यात येत आहेत. तसेच विद्यार्थ्यांच्या प्रवेशावेळी, प्रवेशीत होणा-या महाविद्यालयात विद्यार्थ्यांचे सर्व प्रमाणपत्रांचे तपासणी करण्यात येणार आहे. व सदर प्रमाणपत्रांची ऑनलाईन सादर केलेली व प्रत्यक्षात दाखल करण्यात येणारी सर्व कागदपत्रे पुन्हा तपासण्यात येणार आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

वक्फ बोर्डाचे न्यायाधिकरण (Tribunal) स्थापित करणेबाबत

(२७) ५७७९ (०५-०५-२०२५). श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर) : सन्माननीय **औकाफ मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वक्फ अंतर्गत अंदाजे तीन हजारांच्या वर तक्रारी किंवा वादग्रस्त दावे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तक्रारी व वादग्रस्त दावे सोडविण्याकरिता वक्फ न्यायधिकरण फक्त छत्रपती संभाजीनगर जिल्हयामध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मराठवाड्यासारखे प्रत्येक जिल्ह्यात वक्फ न्यायाधिकरण स्थापित होण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. माणिकराव कोकाटे (०६-११-२०२५) : (१) होय, खरे आहे.
(२) होय, खरे आहे.
(३) सद्य:स्थितीत महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरणात सुमारे २८०० प्रकरणे प्रलंबित असून जिल्हा निहाय १०० च्या आसपास प्रकरणे आहेत. त्यामुळे प्रत्येक जिल्हयामध्ये वक्फ न्यायाधिकरण उभारणे संयुक्तीक होणार नाही. मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र.१४८/२००४ मध्ये प्रत्येक विभागीय स्तरावर सुनावण्या आयोजित करण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने आदेश दिलेले असून त्यानुसार कार्यवाही कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील क्रीडा संकुलांची दुरवस्था झाल्याबाबत

(२८) ५८२२ (०५-०५-२०२५). श्री.निलेश राणे (कुडाळ) : सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्ग जिल्हयातील सर्व तालुक्यामध्ये क्रीडा संकुल असून निधी अभावी त्यांची दुरवस्था झाल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जिल्हयातील उपलब्ध क्रीडा संकुलामध्ये विविध क्रीडांचे संकुल होण्यासाठी व त्यांना निधी प्राप्त होण्यासाठी सर्व क्रीडाप्रेमी कडून सातत्याने मागणी होत असून याकडे क्रीडा विभाग प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. माणिकराव कोकाटे (०२-१०-२०२५) : (१) व (२) सिंधुदुर्ग जिल्ह्यात दोडामार्ग, सावंतवाडी, कुडाळ आणि वेंगुर्ला तालुक्यांमध्ये निर्माण करण्यात आलेल्या तालुका क्रीडा संकुलांचा व त्यामधील क्रीडा सुविधांचा स्थानिक नागरिक व खेळाडू नियमितपणे लाभ घेत आहेत. तथापि, कणकवली, देवगड, मालवण आणि वैभववाडी या तालुक्यांमध्ये क्रीडा संकुल उभारण्यासाठी जागेच्या पाहणीदरम्यान संबंधित जागा नागरी वस्तीपासून दूर असून, नैसर्गिक समपातळी अभावी त्या योग्य नाहीत.
(३) स्थानिक प्रशासकीय विभागाशी समन्वय साधून कणकवली, देवगड, मालवण आणि वैभववाडी या तालुक्यांमध्ये क्रीडा संकुल उभारण्यासाठी जागा उपलब्ध करून घेण्याबाबत कार्यवाही सुरू आहे. जागा प्राप्त झाल्यानंतर सदर जागा क्रीडा संकुल समितीच्या नावावर वर्ग केल्यानंतर, शासन निर्णय दिनांक २३ मार्च २०२२ नुसार संबंधित जागेस तांत्रिक मान्यता, राज्य क्रीडा विकास समितीची मान्यता व प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाल्यानंतर संकुलाचे बांधकाम कार्य हाती घेण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कृष्णा कॅनॉलमधील जलपर्णी समूळ नष्ट करण्याबाबत

(२९) ६०८२ (३०-०४-२०२५). श्री.अतुलबाबा भोसले (कराड दक्षिण) : सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कराडपासून सुरु होणाऱ्या आणि ४ तालुक्यांचे कार्यक्षेत्र असलेल्या कृष्णा कॅनॉलच्या माध्यमातून १३ हजार हेक्टर क्षेत्रातील गावांमधील शेतीला पाणीपुरवठा होतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामध्ये वाळवा, पलूस, तासगाव, मिरजमधील (ता.कराड, जि.सांगली) काही भागाचा समावेश असून कृष्णा कॅनॉल हा ८६ कि.मी. लांबीचा आहे, उन्हाळ्यात या कॅनॉलवर अवलंबून असणाऱ्या शेती क्षेत्राला मोठा आधार मिळतो, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सध्या कॅनॉलची अवस्था खूपच दयनीय झाली असून कॅनॉलच्या अनेक भागात जलपर्णीचा विळखा वाढला असून गवत, झाडे, झुडपे व वेलींनी कॅनॉलने व्यापला आहे, त्यामुळे पाण्याचे पातळी दिसत नसल्याची स्थिती निर्माण झाली असून त्यामुळे पाण्याच्या प्रवाहाला अडथळा निर्माण झाला असून, पुढील गावांपर्यंत पाणी गतीने पोहचण्यात अडचणी निर्माण होत आहेत त्यामुळे कॅनॉलवर अवलंबून असलेल्या शेतीच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कृष्णा कॅनॉलमधील जलपर्णी समूळ नष्ट करण्यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना करणे गरजेचे असून याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-०८-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे अंशत: खरे आहे.
कृष्णा कालवा ब्रिटीश कालीन असून या कालव्याचा बहुतांश भाग काळ्या मातीतून जातो तसेच या भागात पर्जन्यमान तुलनेने जास्त असलेने कालव्याच्या काही भागात गवत, झाडे, झुडपे, वेली व जलपर्णीची वाढ झाल्याने पाण्याची पातळी दिसत नाही. त्यामुळे काही साखळी क्रमांका मध्ये पाण्यास अडथळा निर्माण होवून पाणी गतीने पोहचण्यास अडचणी निर्माण होत आहे.
(४) कृष्णा कॅनॉल मधील जलपर्णी नष्ट करण्यासाठी व गवत, झाडे, झुडपे, गाळ काढणेसाठी यांत्रिकी विभागामार्फत मशिनरी उपलब्ध करुन घेवून कामे सुरु आहेत.

तसेच या कालव्यामधील जलपर्णी नष्ट करण्यासाठी व कृष्णा कालवा काटछेद पूर्ववत करणेकरिता विस्तार व सुधारणा अंतर्गत ५ कामांपैकी ४ कामे सध्या प्रगतीत असून एका कामाचे अंदाजपत्रक तयार करणेचे काम क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे. सर्व चालु कामे निधी उपलब्धतेनुसार पूर्ण करणेचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

परळी वैजनाथ (ता.परळी, जि.बीड) येथील क्रीडा संकुलाच्या उभारणीबाबत

(३०) ७१४७ (१९-०८-२०२५). श्री.धनंजय मुंडे (परळी) : सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परळी वैजनाथ (ता.परळी, जि.बीड) शहरात तालुका क्रीडा संकुलासाठी आवश्यक असलेल्या जागेचे अधिग्रहण पूर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वरील जागेवर क्रीडा संकुल उभारणीसाठी आराखड्यास मंजुरी मिळावी, यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी, बीड यांच्या कार्यालयाकडून शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तालुका क्रीडा संकुल तसेच प्रकल्पासाठी निधी मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. माणिकराव कोकाटे (१०-१०-२०२५) : (१), (२) व (३) जलालपूर ता.परळी, जि.बीड येथील उद्योग, ऊर्जा, व कामगार विभागाच्या अखत्यारीतील जागा परळी तालुका क्रीडा संकुलासाठी विनामूल्य देण्याचा प्रस्तावित आहे. मात्र, सदर जागेचे हस्तांतरण त्या विभागाकडून अद्याप क्रीडा संकुल समितीच्या नावे झालेले नाही. प्रथम ही जागा अधिकृतपणे क्रीडा संकुल समितीच्या नावे वर्ग होणे आवश्यक आहे. त्यानंतर शासन निर्णय दिनांक २३ मार्च, २०२२ अन्वये पुढील कार्यवाही करण्याचे प्रयोजित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्यांबाबत

(३१) ७१६७ (१८-०८-२०२५). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात या वर्षी कापसाचे उत्पादन घटले असून खर्चही वाढला आहे, उत्पादकता घटल्याने तसेच कापसाला एमएसपीच्या आसपास दर मिळत नसल्याने शेतकरी कापसाला पर्यायी पिक शोधत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील दोन वर्षापासून मका व तुरीला एमएसपी पेक्षा अधिक दर मिळाला असून कापसाच्या तुलनेत या दोन्ही पिकांचा उत्पादन खर्च कमी असल्याने शेतकरी या पिकांकडे वळत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात किमान १०० ते ११५ लाख गाठी कापसाचे उत्पादन होत असले तरी ७७ ते ८५ लाख गाठींच्या आसपास दाखविण्यात येते, कापड उद्योजकांच्या काही संस्था याच चुकीच्या आकडेवारीमुळे कापसाचे दर कमी ठेवण्यासाठी वापर करीत असल्याने कापुस उत्पादक शेतक-यांचे नुकसान होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मुद्दा क्र.१ ते ३ मध्ये कापसाचे उत्पादकता व कापसाचे दर एमएसपी पेक्षा अधिक कसे मिळवता येईल याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार रावल (२०-११-२०२५) : (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात सन २०२४-२०२५ मध्ये कापूस पिकाचे क्षेत्रात, उत्पादनात व उत्पादकतेत सरासरीच्या तुलनेत अनुक्रमे ३%, १०% व ७% घट झाली आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

मागील २ वर्षापासून मका पिकाला तुलनेत अधिक दर मिळाला असून, शेतकरी या पिकांकडे वळत आहेत.

(३) हे खरे नाही.

राज्यात कापूस हंगाम २०२१-२०२२ मध्ये ८२.४९ लाख गाठीचे, कापूस हंगाम २०२२-२०२३ मध्ये ८३.१६ लाख गाठी, कापूस हंगाम २०२३-२०२४ मध्ये ८०.४५ लाख गाठी तर कापूस हंगाम २०२४-२०२५ मध्ये ८९.०९ लाख गाठी उत्पादन झाले असल्याचे सी.ए.आय. च्या वेबसाईट वर नमूद आहे.

(४) सुधारित मशागत पद्धती व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कापसाचे प्रति हेक्टरी उत्पादन वाढवण्यासाठी सन २०१४-२०१५ पासून राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान, वाणिज्यिक पिके अंतर्गत कापूस विकास कार्यक्रम राबविण्यात येत होता.

सदर योजना सन २०२५-२०२६ पासून राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान या नावाने राबविण्यात येत आहे. यामध्ये पीक प्रात्याक्षिके- आद्यरेषीय आंतरपिके प्रात्याक्षिके (कापूस पिकात मूग, उडीद), कापसाच्या सरळ वाणांची अतिघन लागवड पद्धतीची प्रात्याक्षिके, एकात्मिक पीक व्यवस्थापन प्रात्याक्षिके, एकात्मिक कीड व्यवस्थापन व फ्लेक्सी घटक- फरदड निर्मुलन प्रात्यक्षिक या घटकांचा समावेश आहे.

बाजार पेठेतील कापसाचे दर मुख्यत: देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर असलेली मागणी व पुरवठा या बाबींवर अवलंबून असतात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

अहिल्यानगर जिल्ह्यातील पुरवठा विभागाच्या गोदामांमध्ये असलेल्या सुरक्षाविषयक त्रुटींबाबत

(३२) ७१८३ (१८-०८-२०२५). श्री.काशिनाथ महादु दाते सर (पारनेर) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहिल्यानगर जिल्ह्यातील लाभार्थ्यांना अन्नधान्याचा पुरवठा करणाऱ्या पुरवठा विभागाच्या गोदामात सुरक्षाविषयक अनेक त्रुटी असल्याचे याच विभागाने नियुक्त केलेल्या त्रयस्थ संस्थेने त्यांच्या अहवालात नमूद केल्याचे माहे मार्च, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहिल्यानगर जिल्ह्यात एकूण ८२ गोदामे असताना केवळ ३८ गोदामेच वापरात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदरहू गोदामात सीसीटीव्ही नसणे, धान्याला कीड लागू नये म्हणून जमिनीवर लाकडी फळ्या नसणे, वजन काटे जुने झालेले असणे तसेच औषध फवारणीसाठी तांत्रिक कर्मचाऱ्यांचा अभाव असणे इत्यादी बाबी या अहवालात नमूद केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. छगन भुजबळ (१५-१०-२०२५) : (१) होय, अंशत: खरे आहे.

(२) अहिल्यानगर जिल्ह्यातील एकूण ८२ गोदामांपैकी सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत ३८ गोदामे वापरात आहेत. ०१ गोदाम भाड्याने दिले आहे. तसेच, ०२ गोदामे नादुरुस्त असून वापरात नाहीत व ४१ गोदामे खूप जुनी असल्याने कायम स्वरुपी वापरण्यास अयोग्य आहेत.

(३) व (४) अहिल्यानगर जिल्ह्यातील शासकीय धान्य गोदामांमध्ये मुलभूत सुविधा पुरविण्याच्या अनुषंगाने त्रयस्थ संस्थेने सादर केलेल्या तपासणी अहवालात उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत शासन स्तरावर निधीची उपलब्धता व कामाचा प्राधान्यक्रम विचारात घेऊन लवकरात लवकर काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, नागपूर येथील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांकडून विलंब शुल्क आकारणीबाबत

(३३) ७२१८ (१९-०८-२०२५). श्री.काशिनाथ महादु दाते सर (पारनेर), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, नागपूर येथील सुमारे ४०० शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना शासनाकडून शिष्यवृत्ती वितरणास विलंब झाल्यामुळे शैक्षणिक शुल्क वेळेत भरता न आल्याने ५०० रुपये प्रतिदिन या प्रमाणे विलंब शुल्क आकारण्यात आले असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासवर्गीय व इतर पात्र शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांकडून विलंब शुल्क स्वरूपात ३० ते ५० हजार रुपये आकारण्यात आले असून, विलंब शुल्क न भरलेल्या विद्यार्थ्यांचे निकाल व परीक्षा प्रवेशपत्रही अडविण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत दरवर्षी अशा शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांकडून कोणतेही शुल्क आकारू नये, कागदपत्रे व निकाल अडवू नयेत, अशा स्पष्ट सूचना दिल्या जात असतानाही संबंधित विद्यापीठात अशा कार्यपद्धती अवलंबली जात असल्याने याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१३-१०-२०२५) :(१) हे अंशत: खरे आहे.

विद्यापीठाच्या कार्यकारी परीषदेच्या ठरावानुसार शिष्यवृत्तीच्या रक्कमे व्यतिरीक्त इतर घटकावर दंड आकारण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तथापि, तद्नंतर सदरचा निर्णय स्थगित करण्यात आला असून कार्यकारी मंडळाकडुन पुढील निर्णय व मार्गदर्शक सुचना प्राप्त होईपर्यंत यासंबंधी कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

अमरावती जिल्ह्यात मेगा टेक्स्टाईल पार्क सुरु करण्याबाबत

(३४) ७९४९ (०८-०९-२०२५). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) : सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयात ‘‘मेगा टेक्स्टाईल पार्क’’ सुरु करण्यासाठी राज्य शासन व केंद्र शासनामध्ये सामंजस्य करार करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देशामध्ये केंद्र शासनाकडून ७ ठिकाणी ‘‘मेगा टेक्स्टाईल पार्क’’ निर्माण केले असून राज्यातील

अमरावतीमध्ये १ पार्क घोषित केले असल्यामुळे त्याची संख्या वाढवावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच सोलापूर जिल्हा हा वस्त्र उद्योगात संपूर्ण देशात प्रसिद्ध असून येथे चादरी, टॉवेल व स्कूल युनिफॉर्मचे हब झाले असल्याने येथे टेक्स्टाईल पार्क निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना पालक सचिव आणि जिल्हाधिकारी यांना दिल्याचे माहे मार्च, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त उद्योजकांना इतर कोणकोणत्या सवलती देण्यात येणार आहेत, तसेच त्यानुसार सदर उद्योगांसाठी प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टन्सीसाठी शासनाकडून नेमण्यात येणार आहे काय व त्याबाबतचे स्वरुप काय आहे,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी सोलापूर येथे टेक्सटाईल पार्क निर्माण करण्यासह अमरावती जिल्ह्यातील टेक्सटाईल्स पार्कची संख्या वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संजय सावकारे (२४-०९-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) केंद्र शासनाने देशातील ७ राज्यामध्ये मेगा इंटीग्रेटेड टेक्सटाईल पार्क स्थापन करण्याचे घोषित केले असून त्यापैकी महाराष्ट्र राज्यातील अमरावती येथे एक मेगा इंटीग्रेटेड टेक्सटाईल पार्क उभारण्यास केंद्र शासनाने मान्यता दिली आहे.

राज्यातील अमरावतीमधील एक पार्क घोषित केले असल्याने त्याची संख्या वाढवावी, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केल्याबाबतचे निवेदन शासनास प्राप्त झालेले नाही.
(३) सोलापूर येथे टेक्स्टाईल पार्क स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेले नाही.
(४) शासन निर्णय दिनांक ०२.०६.२०२३ अन्वये राज्याचे नवीन एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ जाहीर करण्यात आलेले असून या धोरणामध्ये ५ वर्षात २५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक व ५ लाख रोजगार निर्मीतीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. सदर धोरणा अंतर्गत वीजदर सवलत, भांडवली अनुदान, सौरउर्जा अनुदान अशा विविध सवलतीचा लाभ राज्यातील वस्त्रोद्योग घटकांना देण्यात येणार आहे. तसेच शासनाकडून वस्त्रोद्योगांसाठी प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टन्सी नेमण्यात आलेली नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील शाळांसाठी बंधनकारक असलेल्या 'स्कॉफ' स्वयं-मूल्यांकन प्रक्रियेबाबत

(३५) ८०२७ (१९-०८-२०२५). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महाविद्यालयांना "नॅक" (NAAC) मानांकन बंधनकारक असल्याप्रमाणेच शाळांसाठी देखील "स्कॉफ" (SQAAF) मानांकन बंधनकारक करण्यात आले असून राज्यातील प्रत्येक शाळेने एससीईआरटीच्या पोर्टलवर स्वयं-मूल्यांकन करणे आवश्यक असतांना राज्यातील सुमारे अर्ध्याहून अधिक शाळांनी दुर्लक्ष केल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मुल्यांकनाची मुदत संपल्यावरही राज्यातील एकूण सुमारे १,०८,००० शाळांपैकी केवळ ६१,००० शाळांनीच स्वयं-मूल्यांकन पूर्ण केल्याचे स्पष्ट झाले असून, उर्वरित शाळांकडून सदर प्रक्रिया न केल्याचे

निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार स्वयं-मूल्यांकन न करणाऱ्या शाळांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (१९-०९-२०२५) : (१) हे खरे नाही.

दिनांक १५ मे, २०२५ अखेर राज्यातील एकूण १,०८,५३० शाळांपैकी १,०१,५१० एवढ्या शाळांनी (९३.५३ %) स्वयं-मूल्यांकन पूर्ण केले होते.

(२) स्वयं-मूल्यांकन करण्याकरिता राज्यातील सर्व शाळांना दिनांक ३०.०६.२०२५ ही अंतिम मुदतवाढ देण्यात आलेली होती. दिनांक ३०.०६.२०२५ अखेर राज्यातील एकूण १,०८,५३० शाळांपैकी १,०२,६७५ एवढ्या शाळांनी (९४.६०%) स्वयं-मूल्यांकन पूर्ण केले आहे. तसेच उर्वरित ४७६० या शाळांनी (४.३६%) स्वयं-मूल्यांकनात नोंदणी पूर्ण केले असून माहिती भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तर नोंदणी न केलेल्या शाळांची संख्या ११२५ (१.०४%) आहे.

(३) स्वयं-मूल्यांकन करण्याकरिता नोंदणी न केलेल्या शाळांच्याकडून "नोंदणी न केल्याबाबतचा खुलासा" व माहिती अपूर्ण नोंदविलेल्या शाळांच्याकडून "माहिती अपूर्ण नोंदविलेबाबतचा खुलासा सादर करण्याविषयी आयुक्त (शिक्षण) यांच्या स्तरावरुन शिक्षणाधिकारी (प्राथमिक, माध्यमिक) यांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला जिल्ह्यातील भारतीय कापूस निगम (सीसीआय) कार्यालयामधील असिस्टंट जनरल मॅनेजर यांच्या निलंबनाबाबत

(३६) ८०६१ (२४-०७-२०२५). श्री.देवराव भोंगळे (राजूरा) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील भारतीय कापूस निगम (सीसीआय) कार्यालयामधील असिस्टंट जनरल मॅनेजर श्री.निरजकुमार यांचेवर शिस्तभंगाची कारवाई करून त्यांना निलंबित करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २५ मार्च, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निवेदन देऊन मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार रावल (२६-०९-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर निवेदन शासनाच्या दिनांक १५.०९.२०२५ रोजीच्या पत्रान्वये अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, भारतीय कपास निगम लि. (CCI) यांना आवश्यक त्या कारवाईसाठी पाठविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

नवीन शैक्षणिक धोरण लागू करण्याआधी अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करणेबाबत

(३७) ८०९८ (१९-०८-२०२५). श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नवीन शैक्षणिक धोरण माहे जून, २०२५ पासून लागू करण्यात येणार असून त्याची अंमलबजावणी करण्याआधी अतिरिक्त शिक्षक किती हे ठरत नसल्याने शालेय शिक्षण विभागात मोठा गोंधळ निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षण आयुक्तांनी दिनांक २२ जानेवारी, २०२५ रोजी आदेश निर्गमित करून, अतिरिक्त शिक्षकांचे प्रमाण ठरेपर्यंत शिक्षक भरती प्रक्रिया राबवू नये असे निर्देश दिले होते. त्यामुळे पोर्टलवर प्रसारित करण्यात आलेल्या शिक्षक भरतीच्या जाहिराती तूर्तास स्थगित करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन वेगाने पूर्ण करून पुढील शिक्षक भरतीची अंमलबजावणी सुरळीत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (१५-१०-२०२५) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही. पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक सेवक/शिक्षक पदभरतीसंदर्भात टप्पा २ मध्ये वेब पोर्टलवर जाहिरात देण्यात आलेली आहे.
(३) व (४) सन २०२४-२५ निर्गमित संच मान्यतांनुसार अतिरिक्त ठरणाऱ्या शिक्षक समायोजनाबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे सदरील प्रकरण सदयस्थितीत न्यायप्रविष्ठ आहे.

बारावीच्या १२४ केंद्रांची मान्यता धोक्यात असल्याबाबत

(३८) ८४२८ (२४-०७-२०२५). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात यंदा बारावीच्या परिक्षेदरम्यान कॉपीमुक्त अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार बैठे पथक, भरारी पथक, महिला पथक, विशेष भारी पथक, आकस्मिक भेटी, परिक्षा केंद्रांवर चित्रीकरण, ड्रोनद्वारे देखरेख अशा विविध उपाययोजना करण्यांत आल्या असून गैरप्रकार होणाऱ्या परिक्षा केंद्रांची मान्यता कायमस्वरुपी रद्द करण्याचा इशारा शालेय विद्यार्थ्यांना देण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यभरातील एकूण १२४ परिक्षा केंद्रांवर परिक्षेदरम्यान गैरप्रकार झाले असून त्यानुसार किती विभागातील परिक्षा केंद्रांवर असे गैरप्रकार घडल्याचे निदर्शनास आले आहे,
(४) असल्यास, त्याप्रमाणे या परिक्षा केंद्रांवर घडलेल्या एकूण ३६७ गैरप्रकारांची पडताळणी करुन त्याची सुनावणी घेऊन दोषी आढळणाऱ्या संबंधित परिक्षा केंद्रांची मान्यता कायमस्वरुपी रद्द करण्याबाबत शासनाने प्रकरण निहाय कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

श्री. दादाजी भुसे (१३-१०-२०२५) : (१) होय,हे खरे आहे.
इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी च्या बोर्डाच्या परीक्षा निकोप वातावरणात होण्यासाठी व या परीक्षांमध्ये होणा-या गैरप्रकारांवर आळा घालण्यासाठी यावर्षी राज्यभर कॉपीमुक्त परीक्षा अभियान राज्यात राबविण्यात आले होते.
(२) होय, हे खरे आहे.
(३) राज्यभरातील १२४ परीक्षा केंद्रावर गैरप्रकार झाल्याचे आढळून आले आहे. एकुण ९ विभागीय मंडळापैकी ५ विभागांमध्ये कॉपीची प्रकरणे आढळून आली आहेत.
(४) महाराष्ट्र राज्य माध्य व उच्च माध्य. शिक्षण मंडळाच्या परीक्षा २०२५ मध्ये झालेल्या गैरप्रकरणांची पडताळणी राज्य मंडळ, पुणे व विभागीय मंडळ कार्यालयांकडून करण्यात आली आहे. ज्या परीक्षा केंद्रावर गैरप्रकार आढळून आली आहेत त्यांची विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन मान्यता रद्द करण्याच्या अनुषंगाने राज्य मंडळ, पुणे यांच्या स्तरावरुन दिनांक १९.०८.२०२५ च्या पत्रान्वये विभागीय मंडळांना कळविण्यात आले आहे.

परभणी जिल्ह्यातील बीजीएम (BGM) लाइनिंगबाबत

(३९) ८७१६ (०८-०९-२०२५). श्री.राजेश विटेकर (पाथरी) : सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील १२४ ते १२६.५० किलोमीटर दरम्यान जायकवाडी पाटबंधारे विभागाच्या कालव्यांचे अस्तरीकरण करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी सन २०२५ मध्ये मा.मुख्यमंत्री, मा.उप मुख्यमंत्री, जलसंपदा मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उपमुख्यमंत्री यांचे कार्यालयाने कार्यकारी संचालक गोदावरी मराठवाडा पाटबंधारे महामंडळ छत्रपती संभाजीनगर यांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबत कळविले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील BGM लाइनिंगसाठी निधी व प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधा कृष्ण विखे-पाटील (१७-१०-२०२५) : (१) व (२) हे खरे आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १४.०१.२०२५ व दिनांक १३.०५.२०२५ रोजीच्या निवेदनाद्वारे परभणी जिल्ह्यातील पैठण डावा मुख्य कालवा सा. क्र. १२४/१० ते १२६/५० दरम्यान अस्तरीकरण करणेबाबतच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतची मागणी केली आहे.

(३) व (४) पैठण डावा मुख्य कालवा सा. क्र. १२४/१० ते १२६/५० दरम्यानच्या अस्तरीकरण बाबतचा प्रशासकीय मान्यता प्रस्ताव महामंडळाकडून शासनास प्राप्त आहे. मान्यतेची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील अनधिकृत सावकारी व्यवसाय करणा-यांवर "फ्लाईंग स्कॉड" स्थापन करणेबाबत

(४०) ८८०१ (१९-०८-२०२५). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनधिकृत सावकारी व्यवसाय करणा-या व्यक्तींवर कारवाई करण्याच्या उद्देशाने तसेच सावकारी व्यवसायावर योग्य नियंत्रण ठेवण्यासाठी महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा स्तरावर त्रिसदस्यीय फ्लाईंग स्कॉड (मध्यवर्ती भरारी पथक) गठीत करण्याचा निर्णय घेण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सन २०१७ रोजी “फ्लाईंग स्कॉड” स्थापन करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी कार्यालयांना दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निर्देशांचे अद्यापही पालन केले नसल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निर्देशांचे पालन तातडीने करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाबासाहेब पाटील (३१-१०-२०२५) : (१) होय, अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ ची काटेकोरपणे अंमलबजावणी होण्यासाठी जिल्हा स्तरावर शासन निर्णय, दिनांक १ मार्च, २०१७ अन्वये तीन सदस्यांची समिती गठित करण्यात आली होती. शासन

निर्णय दिनांक १७.०७.२०२५ अन्वये सदर समितीमध्ये (१) संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अथवा त्यांचे प्रतिनिधी (अपर जिल्हाधिकारी वा उपजिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी), अध्यक्ष, (२) संबंधित जिल्ह्याचे जिल्हा पोलीस अधीक्षक अथवा त्यांचे प्रतिनिधी (अपर पोलीस अधिक्षक वा पोलीस उप अधिक्षक दर्जाचा अधिकारी), सदस्य व (३) संबंधित जिल्ह्याचे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सदस्य सचिव असे तीन सदस्य आहेत. असा अंशत: बदल करण्यात आला आहे.

(२) होय, अंशत: खरे आहे.

उपरोक्त नमूद शासन निर्णयान्वये गठित केलेल्या समितीने आवश्यकतेनुसार अवैध सावकारी रोखण्यासाठी भरारी पथके निर्माण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) नाही.

समितीच्या सन २०१७-१८ ते २०२४-२५ या कालावधीत राज्यातील सर्व जिल्ह्यात मिळून एकूण १४० सभा झालेल्या आहेत.

(४) शासन निर्णय दिनांक १७/०७/२०२५ अन्वये दिलेल्या निर्देशांचे सर्व जिल्ह्यात पालन करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

चंद्रपूर जिल्हा क्रीडा संकुलात "स्क्वॉश कोर्ट" व अन्य अद्ययावत क्रीडा सुविधांबाबत

(४१) ८८२२ (०८-०९-२०२५). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) : सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यात "स्क्वॉश" या ऑलिम्पिक मान्यताप्राप्त खेळाची अधिकृत संघटना अस्तित्वात असूनही जिल्हा क्रीडा संकुल, चंद्रपूर येथे "स्क्वॉश कोर्ट" उपलब्ध नसल्यामुळे स्थानिक खेळाडूंना संधी नाकारत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा क्रीडा अधिकारी, चंद्रपूर यांनी दिनांक १४ ऑक्टोबर, २०२४ रोजी नाविन्यपूर्ण योजना निधी सन २०२४–२५ अंतर्गत स्क्वॉश इमारतीसाठी रू.१२४.२२० लक्ष निधीसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, चंद्रपूर जिल्हा क्रीडा संकुलासाठी एकूण रू.५७१८.३० लक्ष निधी मंजूर करून पहिल्या टप्प्यात रू.३ कोटी निधी सार्वजनिक बांधकाम विभागास वर्ग करण्यात आल्याचे आणि उर्वरित कामासाठी दिनांक २८ एप्रिल, २०२५ रोजी रू.१० कोटी अतिरिक्त निधीची मागणी करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या सर्व क्रीडा सुविधांमुळे जिल्ह्यातील युवक व युवतींना खेळाच्या क्षेत्रात संधी मिळावी यासाठी सदर कामे शक्य तितक्या लवकर पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. माणिकराव कोकाटे (०३-११-२०२५) : (१), (२) व (३) दिनांक १४ ऑक्टोबर, २०२४ रोजी जिल्हा क्रीडा अधिकारी, चंद्रपूर यांनी नाविन्यपूर्ण योजना सन २०२४-२५ अंतर्गत स्क्वॉश इमारतीसाठी रु.१२४.२२० लक्ष निधीची मागणीचा प्रस्ताव जिल्हा नियोजन अधिकारी,चंद्रपूर यांच्याकडे सादर केला आहे. सदर प्रस्तावास जिल्हाधिकारी,चंद्रपूर यांच्याकडून अद्याप प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली नाही.सदर प्रस्तावास मान्यता प्राप्त झाल्यानंतर स्क्वॉश कोर्टसह इतर सुविधा पूर्ण करण्यासाठी गती देण्यात येईल.

(४) व (५) चंद्रपूर जिल्हा क्रीडा संकुलासाठी एकूण रु.७७१८.३० लक्ष खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून, त्यापैकी रु.२३००.०० लक्ष शासन अनुदान जिल्हा क्रीडा संकुल समितीस वितरीत

करण्यात आले आहे.चंद्रपूर जिल्हा क्रीडा संकुल समितीस वितरीत करण्यात आलेले शासन अनुदानातून विविध क्रीडा सुविधा पूर्ण करण्यात आल्या असून नागरिक व खेडाळू वापर करित आहेत.
६) प्रश्न उद्‌भवत नाही.

वक्फ जमिनीतील गैरव्यवहारबाबत चौकशी करणेबाबत

(४२) ८९९६ (०८-०९-२०२५). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.राजन नाईक (नालासोपारा) : सन्माननीय **अल्पसंख्याक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २००० ते २०१४ या कालावधीत वक्फ जमिनीमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता व आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत कारवाई करण्यात येणार असल्याचे मा.मुख्यमंत्री यांनी माहे एप्रिल, २०२५ मध्ये जाहीर केले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, वक्फ जमिनीतील व्यवहारात काही राजकीय व्यक्ती, अधिकारी किंवा अन्य घटक यांचा समावेश असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी शासनाने निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केलेली असून त्याने आपला अहवाल शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, चौकशी अहवालाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली असून सदर प्रकरणात दोषी ठरविण्यात आलेल्या व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. माणिकराव कोकाटे (०६-११-२०२५) : (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळातील कथित गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी चौकशी आयोग अधिनियम, १९५२ (१९५२ चा ६०) मधील तरतुदीनुसार शासन अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण १०/०७/ प्र.क्र.१७५/ ल-३, दिनांक ९.१०.२००७ अन्वये श्री.ए.टी. ए. के.शेख, सेवानिवृत्त जिल्हा व सत्र न्यायाधिश या एक सदस्यीय चौकशी आयोगाची स्थापना करण्यात आली होती. सदर चौकशी आयोगाने चौकशी अंती सादर केलेला चौकशी अहवाल व त्यानुषंगाने शासनाने केलेल्या कार्यवाहीचा कृती अहवाल दिनांक १०.०४.२०१५ रोजी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहात पटलावर ठेवण्यात आलेला आहे. आयोगाने अहवालात नमूद केलेल्या प्रकरणांमध्ये तसेच त्याच्याशी समान असलेल्या अन्य प्रकरणांमध्ये बेकायदेशीररित्या विक्री, अदला-बदल इ. झालेल्या वक्फ मालमत्ता वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याच्या दृष्टीने वक्फ अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या वक्फ मंडळाला सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(६) प्रश्न उदभवत नाही.

नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत निरक्षर व्यक्तींचे सर्वेक्षण शिक्षकांकडून न करता इतर यंत्रणेमार्फत करण्याबाबत

(४३) ९०३३ (०८-०९-२०२५). श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राजन नाईक (नालासोपारा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत राज्यातील निरक्षर नागरिकांचे सर्वेक्षण करण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे

शिक्षण संचालक यांनी दिनांक ९ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यादरम्यान आदेश निर्गमित केले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षकांना “उल्लास” या मोबाईल ॲपद्वारे निरक्षर व्यक्तींची नोंदणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, एकीकडे दहावी व बारावीच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन, निपुण भारत उपक्रम, शालेय कामकाज, शालाबाह्य बालकांचे सर्वेक्षण अशी विविध कामे शिक्षकांवर सोपविण्यात आलेली असताना, त्याचवेळी निरक्षर नागरिकांचे सर्वेक्षणाचे अतिरिक्त कार्य देण्यात आल्याने शिक्षक विद्यार्थी शिक्षणाकडे लक्ष कसे देणार, असा प्रश्न शिक्षक संघटनांनी उपस्थित केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, निरक्षर व्यक्तींचे सर्वेक्षणाचे कार्य शिक्षकांकडून न करता इतर यंत्रणेमार्फत करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (०७-११-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील शिफारसींनुसार उल्लास नवभारत साक्षरता अभियानामार्फत प्रौढ व्यक्तींना साक्षर करण्यात येत असते. या केंद्रपुरस्कृत योजनेंतर्गत उल्लास या मोबाईल ॲपच्या सहाय्याने निरक्षरांचे सर्वेक्षण करण्यात येते. अशा निरक्षर व्यक्तींना पायभूत व संख्या ज्ञान देऊन साक्षर करण्यात येत आहे.
(३) हे खरे नाही.

केंद्रशासनाच्या आराखड्या नुसार उल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रमाच्या अंमलबजावणी करण्यासाठी शाळा हेच एकक ठरविण्यात आले आहे. त्यामुळे निरक्षर व्यक्तींच्या सर्वेक्षणाची जबाबदारी शाळेवर निश्चित करण्यात आली आहे. तसेच अशा असाक्षरांचे सर्वेक्षण करणे व त्यांना साक्षर करणे हे शैक्षणिक कार्य असल्यामुळे हे अतिरिक्त कार्य समजण्यात येणार नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

शालेय शिक्षण विभागातील ई-ऑफीस प्रणालीच्या अंमलबजावणीबाबत

(४४) ९१०२ (२४-०७-२०२५). श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शालेय शिक्षण विभागाच्या विविध कार्यालयांमध्ये ई-ऑफीस प्रणालीचा शंभर टक्के वापर अद्यापही सुरू झाला नसल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संगणक, इंटरनेट, स्कॅनर, दर्जेदार प्रिंटर तसेच कुशल मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे ई-ऑफीस प्रणालीच्या प्रभावी अंमलबजावणीत अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ई-ऑफीस प्रणालीत प्रत्येक प्रकरणाची संपूर्ण फाईल स्कॅन करून अपलोड करण्याची वेळखाऊ प्रक्रिया सुरू असल्याने फायलींच्या प्रलंबनामुळे शिक्षक, कर्मचारी व संघटनांचे पदाधिकारी कामकाजाच्या पाठपुराव्यासाठी कार्यालयीन हेलपाटे मारत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ई-ऑफीस प्रणालीच्या प्रभावी व यशस्वी अंमलबजावणीसाठी विभागनिहाय नोडल अधिकारी व सल्लागार नेमण्यात आले असून यासंदर्भात अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रणालीसंदर्भात तातडीच्या सुधारणा व सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (१३-११-२०२५) : (१) ते (३) हे खरे नाही.

शालेय शिक्षण विभागाच्या मंत्रालयीन विभागात तसेच आयुक्त (शिक्षण) कार्यालय व उपसंचालक कार्यालयातील सर्व कामकाज १००% ई-ऑफिस प्रणालीव्दारेच करण्यात येत आहे. तसेच विभागात ई-ऑफीस प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण येत नाही.

(४) शिक्षण आयुक्तालयाच्या दिनांक१७.०४.२०२५ आदेशान्वये नोडल अधिकारी व सल्लागार यांची ई-ऑफिस प्रणाली कार्यान्वित करताना येणा-या अडचणींची सोडवणूक करण्यासाठी नेमणूक करण्यात आली होती. त्यानुसार संबंधितांकडून विभागाकडील येणा-या विविध अडचणींची सोडवूणक करण्यास सहाय्य केलेले आहे.

(५) ई-ऑफिस प्रणालीच्या अनुषंगाने आवश्यक त्या सुविधा शिक्षण आयुक्तालयामार्फत पुरविण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील सहकार कायदयात तज्ञांची समिती स्थापन करण्याबाबत

(४५) ९११२ (२३-०७-२०२५). श्री.बाबुराव कदम - कोहळीकर (हदगाव), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सहकार कायदयात काळानुरुप बदल सुचविण्यासाठी तज्ञांची समिती स्थापन करण्याचे मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक १२ मे, २०२५ रोजी वा त्यादरम्यान पुणे येथे घोषणा केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीचे सदस्य कोण आहेत व समितीची कार्यकक्षा काय आहे,

(३) असल्यास, समितीचा अहवाल किती कालावधीत प्राप्त होणार आहे,

श्री. बाबासाहेब पाटील (२२-०९-२०२५) : (१) अंशतः खरे आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मध्ये कालानुरुप काय बदल करावेत याबाबत एक उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात यावी असे निर्देश मा. मुख्यमंत्री महोदय यांनी दिनांक १४/७/२०२५ रोजी आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ अंतर्गत विविध उपक्रम राबविण्याबाबतच्या राज्य शिखर समितीच्या बैठकीत दिले आहेत.

(२) शासनाकडून राज्याचे सहकार धोरण निश्चित करणेसाठी शासन निर्णय दिनांक २९/१२/२०२३ अन्वये सहकार आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. दिनांक २४/७/२०२५ रोजी केंद्रीय सहकार मंत्रालयाने राष्ट्रीय सहकार धोरण जाहीर केले आहे. मा. मुख्यमंत्री महोदय यांनी दिलेले निर्देश व राष्ट्रीय सहकार धोरणानुसार राज्याचे सहकार धोरण निश्चित करणे व त्यानुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कायद्यात बदल करणेसंदर्भात शासन निर्णय दिनांक २९/१२/२०२३ अन्वये गठीत समितीची पुनर्रचना करुन मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठीत करणेसाठीचा प्रस्ताव सहकार आयुक्त कार्यालयाकडून दिनांक १२/८/२०२५ रोजी शासनास सादर करण्यात आला आहे. त्यावर कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

समग्र शिक्षा अभियानांतर्गत विद्यार्थ्यांना गणवेश, बूट व पायमोजे वितरणाबाबत

(४६) ९५६५ (०८-०९-२०२५). श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्रीमती सरोज अहिरे (देवळाली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.राजन नाईक (नालासोपारा) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समग्र शिक्षा अभियानांतर्गत इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना दोन मोफत गणवेश, एक जोडी बूट व दोन जोडी पायमोजे शाळेच्या पहिल्याच दिवशी देण्यात येणार असल्याचे शासनाने जाहीर केले असून, प्रत्यक्षात जिल्हा परिषदेकडून एकच गणवेश देण्यात आला असून महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत (माविम) देण्यात येणारा दुसरा गणवेश अनेक विद्यार्थ्यांना अद्याप अप्राप्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्येक विद्यार्थ्याला एका गणवेशासाठी ३०० रुपये व बूट-पायमोजेसाठी १७० रुपये अशी एकूण ४७० रुपये शाळा व्यवस्थापन समितीकडे वितरीत केली जाणार असल्याचे सांगण्यात येते, परंतु या रकमेमध्ये गुणवत्तेचे दोन गणवेश, दोन बूट आणि दोन पायमोजे मिळवणे व्यवहार्य नाही, असा आक्षेप संबंधित समित्यांनी घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात विशेषत: पालघर जिल्ह्यात माविममार्फत वितरित होणाऱ्या गणवेशांचे वाटप अद्यापही झाले नसून, यामुळे विद्यार्थ्यांना संपूर्ण शैक्षणिक वर्ष फक्त एका गणवेशावर काढावे लागत असल्याचे व योजनेतील निधीचा विनियोग न झाल्याने पालकांमध्ये नाराजी व्यक्त होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने वस्त्रोद्योग किंवा इतर पुरवठादारांमार्फत वेळेवर साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी वाढीव निधी किंवा इतर उपाययोजना केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) राज्यातील अनेक खाजगी शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सदर योजनेतील सुविधा मिळत नसल्याने शासकीय धोरणामध्ये दुजाभाव होत असल्याची भावना निर्माण झाली असून, यामुळे शासकीय व खाजगी शाळांतील विद्यार्थ्यांमधील असमतोल दूर करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (३०-०९-२०२५) : (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षामध्ये मोफत गणवेश योजनेंतर्गत दोन गणवेशापैकी नियमित एक गणवेश महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत तसेच, स्काऊट व गाईड अनुरूप दुसरा गणवेश संबंधित शाळा व्यवस्थापन समितीमार्फत शिलाई करुन देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुषंगाने पालघर जिल्हयातील सर्व लाभार्थ्यांना स्काऊट व गाईड अनुरूप गणवेशाचा लाभ शाळा व्यवस्थापन समितीद्वारे देण्यात आला आहे. तथापि, महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत सद्यस्थितीत एकूण १,६०,९१७ विद्यार्थ्यांपैकी १,४१,२५८ विद्यार्थ्यांना गणवेशाचा लाभ देण्यात आला आहे.

(४) राज्यातील विद्यार्थ्यांना मोफत गणवेश, बुट व पायमोजे विहित वेळेत मिळण्याकरिता संबंधित शाळा व्यवस्थापन समितीमार्फत लाभ देण्याचा निर्णय दिनांक ०२ एप्रिल, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

(५) व (६) केंद्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे समग्र शिक्षा अभियानातंर्गत शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळामधील इयत्ता १ ली ते ८ वीच्या वर्गातील सर्व मुली, अनुसूचित जाती / जमातीची सर्व मुले आणि दारिद्र्य रेषेखालील पालकांची मुले यांना मोफत गणवेशाचा लाभ देण्यात येतो. तसेच, उपरोक्त शाळांमधील दारिद्र्य रेषेवरील पालकांची मुले यांना राज्य योजनेंतर्गत गणवेशाचा लाभ देण्यात येतो.

नवरगाव धरणातील पाणी तातडीने निर्गुडा नदीपात्रात सोडण्याबाबत

(४७) ९७२३ (१९-०८-२०२५). श्री.संजय देरकर (वणी) : सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील वणी शहर व परिसरात भीषण पाणी टंचाई निर्माण झाल्यामुळे नवरगाव धरणातील पाणी तातडीने निर्गुडा नदीपात्रात सोडण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींकडून माहे एप्रिल, २०२५ मध्ये मा.पालकमंत्री यांच्या उपस्थितीत आढावा बैठक घेतली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश पालकमंत्री यांचेकडून संबंधित अधिका-यांना देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१४-११-२०२५) : (१), (२) व (३) होय.

मा.पालकमंत्री यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयात दिनांक २६.४.२०२५ रोजी झालेल्या आढावा बैठकीमध्ये स्थानिक लोकप्रतिनिधींनी निर्गुडा नदीत पाणी सोडण्याची मागणी केली होती. त्यानुसार जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्या दिनांक ०१.०५.२०२५ च्या आदेशान्वये, त्याच दिवशी नवरगांव प्रकल्पातून ०.१८ द.ल.घ.मी. पाणी निर्गुडा नदीपात्रात सोडण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबई विद्यापीठ येथे उर्दू घर स्थापन करण्याबाबत

(४८) ९८५९ (०८-०९-२०२५). श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने मुंबई विद्यापीठात उर्दू घर स्थापन करण्याचा निर्णय घेतला असून याबाबत मात्र कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील आग्रीपाडा येथे महानगरपालिकेमार्फत उर्दू घर व लर्निंग सेंटर उभारण्याचा प्रस्ताव मंजूर होऊन काही प्रमाणात काम सुरूही झाल्यानंतर ते बांधकाम थांबविण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई विद्यापीठात उर्दू घर उभारण्यासंबंधी व आग्रीपाड्यातील प्रलंबित प्रकल्पासंदर्भातील वस्तुस्थिती काय आहे, त्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

ॲड. माणिकराव कोकाटे (०६-११-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) मुंबई विद्यापीठाच्या कलिना परिसरात डॉ.झाकीर हुसेन उर्दु घर उभारण्यास दिनांक २६.८.२०१४ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली होती. मात्र शासनाने घालून दिलेल्या अटी विद्यापीठास मंजूर नसल्याने तसेच याबाबत शासनस्तरावर वारंवार बैठका घेऊनही विद्यापीठाकडून सकारात्मक कार्यवाही करण्यात आली नसल्याने सदर उर्दू घराचे काम सुरु झालेले नाही.

तसेच मुंबई महानगर पालिकेकडून भायखळा विभागातील नगर भूक्रमांक १९०८ येथे उर्दू भाषा प्रशिक्षण केंद्र बांधण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली होती. त्यानुषंगाने दिनांक १०.११.२०२२ पासून प्रत्यक्ष काम सुरु करण्यात आले होते. मात्र प्रस्तुत कामाच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आलेली असल्याने दिनांक ११.०८.२०२३ पासून सदर जागेवरील बांधकाम थांबविण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

वक्फ बोर्डाच्या ऑनलाईन नोंदणीतील अडचणीबाबत

(४९) ९८६७ (०८-०९-२०२५). श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **औकाफ मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वक्फ बोर्डाने ऑनलाईन नोंदणी प्रणाली सुरू करून ऑफलाईन नोंदणी बंद केल्यामुळे तसेच तांत्रिक बिघाडांमुळे हजारो नागरिकांची नोंदणी न झाल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वक्फ बोर्डाच्या जिल्हा कार्यालय वा मुख्यालयात गेले असता देखील ऑफलाईन नोंदणीस मनाई केली जात असल्यामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ऑनलाईन नोंदणी प्रक्रियेत अडथळे येत असून त्या दूर करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. माणिकराव कोकाटे (०६-११-२०२५) : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) तत्कालीन वक्फ अधिनियम, १९९५ मध्ये दुरुस्ती करुन केंद्र शासनाने उम्मीद अधिनियम, १९९५ पारीत केलेला आहे. सदर कायद्यातील तरतूदीनुसार सर्व वक्फ संस्थांची नोंदणी ही केंद्र शासनाच्या पोर्टलवर करणे बंधनकारक आहे. सदर प्रयोजनासाठी केंद्र शासनाने दिनांक ०६.०६.२०२५ रोजी पोर्टल सुरु केले असून त्यानुसार वक्फ संस्थाची नोंदणीची कार्यवाही ही केवळ ऑनलाईन पध्दतीने सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

अन्न व औषध प्रशासन विभागात औषध निरीक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत

(५०) ११३४१ (२९-०६-२०२५). श्री.अमोल जावळे (रावेर) : सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अन्न व औषध प्रशासन विभागातील औषध निरीक्षकाची एकूण पदे २०० मंजूर असून त्यापैकी ४४ पदे भरलेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नियमानुसार दरमहा आस्थापनांची तपासणी करण्याची आवश्यकता असतांना रिक्त पदांमुळे आस्थापनांची तपासणी होत नसल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास राज्यामध्ये अंदाजे ८०,००० औषध विक्रेते व अंदाजे ९५० औषध उत्पादक असून त्यांची नियमीत तपासणी केली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. नरहरी झिरवाळ (१०-०९-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) औषधे व सौदर्य प्रसाधने कायदा, १९४० व नियम १९४५ अन्वये अन्न व औषध प्रशासनाकडून औषध उत्पादकाच्या नियमित तपासण्या करण्यात येतात. मात्र, औषध निरीक्षकांची पदे रिक्त असल्यामुळे औषध विक्रेत्याच्या नियमानुसार अपेक्षित तपासण्या करणे शक्य होत नाही.

(४) अन्न व औषध प्रशासनातील औषध निरीक्षक, गट-ब या संवर्गातील रिक्त पदे तातडीने भरण्याकरीता शासन पत्र दिनांक १२.०२.२०२५ अन्वये एकूण १०९ पदांच्या पदभरती करण्याबाबतचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आले असून, त्यानुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने औषध निरीक्षकांच्या एकूण १०९ पदांच्या पदभरतीबाबत दिनांक २९.०७.२०२५ रोजी जाहिरात क्र.११६/२०२५ प्रसिध्द केली आहे. याबाबत, पुढील कार्यवाही महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

विधान भवन :
नागपूर.

जितेंद्र भोळे
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.